भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑ ZB 283441

फक्त प्रतिज्ञापत्रासाठी / Only For Affidavit

मुद्रांक विक्री नोंदवही अनु. क्रमांक/दिनांक 22/12/2021
(Serial No. / Date) 12546
मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव
रहिवासाचा पत्ता व सही
(Stamp Purchaser's Name सतिश रामनारायण बोरकर
Place of residence & Signature

श्रीकांत मोहनलाल खडोतकर
मुद्रांक विक्रेता रामटेक ता. रामटेक, जि. नागपूर
ला. न. 2/1999, कोड न. 4604003

शासकीय कार्यालयासमोर/न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र सादर करणेसाठी मुद्रांक कागदाची आवश्यकता नाही. (शासन आदेश दि. 01/07/2004 नूसार)
ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

उपकोषागार कार्यालय, रामटेक
22 DEC 2021
उपकोषागार अधिकारी
रामटेक

# MEMORANDUM OF UNDERSTANDING (MOU)

## सामंजस्य करार

पक्ष क्र. १:- उडाण कम्प्युटर्स ॲन्ड स्किल ॲकेडमी, रामटेक

तर्फे संचालक श्री. सतिश रामनारायण बोरकर

ता. रामटेक जि. नागपूर

पक्ष क्र. २:- श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक

तर्फे प्राचार्य डॉ. संगिता टक्कामोरे

ता. रामटेक जि. नागपूर

सन २०२१-२२ ते २०२३-२०२४ साल कारणे पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ या सामंजस्य कराराद्वारे मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गाचा करारबध्द आराखडा.

राष्ट्रीय संगणक साक्षरता अभियान आणि डिजिटल इंडिया प्रोग्राम अनुसरून ऑल इंडिया कॉउन्सिल फॉर प्रोफेशन एक्सलन्स (AICPE) द्वारे सर्टिफिकेट इन बेसिक कम्प्युटर हा प्रोग्राम श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथे राबविण्यात येणार आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना संगणकीय मुलभूत ज्ञान देणे, कम्प्युटर हार्डवेअर व सॉफ्टवेअर ची माहीती देणे व त्यांना संगणकाचे परिपुर्ण ज्ञान देऊन संगणक साक्षर करणे हा त्यागील हेतू राहील. सोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने आठवडयाच्या प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांकरीता पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. सदर प्रोग्राममध्ये विद्यार्थ्यांचा बौध्दिक, मानसिक व सामाजिक विकास व्हावा याकडे लक्ष दिले जाईल.

सर्टिफिकेट इन बेसिक कम्प्युटर या कोर्सचा कालावधी हा एक महिण्याचा राहील. त्यासाठी विद्यार्थांकडून इंस्टिटयुशनल फी घेतली जाणार नाही. परिक्षा फी - रू.७५०/- व नोंदणी फी - रू. ५०/- असे एकुण रू.८००/-फक्त घेण्यात येईल. विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर त्यांचे ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने पेपर घेऊन त्यांना ऑल इंडिया कॉउन्सिल फॉर प्रोफेशन एक्सलन्स (AICPE) कडून सर्टीफिकेट देण्यात येईल. मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्ग हा प्रोग्राम राबवित असतांना पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ यामधिल शर्ती व अटी खालीलप्रमाणे राहतील -

<u>अटी व शर्ती</u> :-

१) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्ग हा महाविद्यालयाच्या परिसरात घेतल्या जाईल.

२) मुलभुत संगणक प्रशिक्षणाच्या शिकवणीसाठी शिक्षक व त्यांचे मानधन हे पक्ष क्र. १ यांच्या अधिन राहील.

३) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गासाठी वर्गखोली ही पक्ष क्र. २ उपलब्ध करून देतील व त्या वर्गखोलीचा कुठल्याही प्रकारचा दर /भाडे आकारणार नाहीत.

४) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गासाठी लागणारे संगणक पक्ष क्र. १ हे आपल्या स्वखर्चाने उपलब्ध करतील व महाविद्यालय उन्हाळयाच्या सुट्टयामध्ये बंद असेल त्यावेळेस पक्ष क्र. १ हे संगणक व तत्सम साहित्य तेथुन काढून आपल्या सोईनुसार त्याचा उपयोग व उपभोग करतील.

५) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गामध्ये तसेच महाविद्यालयाच्या परिसरामध्ये संगणक शिक्षक, जिल्हा समन्वयक , उडाण कम्प्युटर्स ॲन्ड स्किल ॲकेडमी चे संचालक व टेक्निकल टिम यांच्या व्यतिरीक्त इतर कुणीही येणार नाहीत. प्रस्तुत प्रशिक्षण वर्ग घेण्याशिवाय इतर कार्यासाठी प्रशिक्षण वर्ग खोलीचा उपयोग करता येणार नाही.

६) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थ्यांकडून पक्ष क्र. १ हे प्रति विद्यार्थी रू. ८००/- फक्त (परिक्षा फी - रू.७५०/- व नोंदणी फी - रू. ५०/-) आकारतील. याव्यतिरीक्त कुठल्याही प्रकारचे अधिकचे मुल्य घेण्यात येणार नाहीत.

७) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गाचा कालावधी हा १.५ (दिड) महिन्याचा असुन प्रशिक्षणाची वेळ ही सकाळी ९.०० ते दुपारी ४.०० पर्यंत राहील. परिक्षा ही महाविद्यालयाच्या परिसरामध्येच घेण्यात येईल व रितसर प्रमाणपत्र देण्यात येईल.

८) मुलभुत संगणक प्रशिक्षण वर्गामध्ये कोणत्याही संगणकाची जाणून बुजून केलेली खराबी हे झाल्यास त्याला जबाबदार स्वत: विद्यार्थी राहील व त्यासाठी त्याला दंड आकारण्यात येईल.

वरील सर्व अटी व शर्ती हया पक्ष क्र. १ व पक्ष क्र. २ यांनी वाचुन व समजावुन घेतल्या आहेत व त्यांना हे सामंजस्य करार मंजूर आहे.

स्थळ - रामटेक

HEAD OF INSTITUTE
UDAAN COMPUTER AND SKILL
ACADEMY, RAMTEK
( सही व शिक्का )

पक्ष क्र. १
उडाण कम्प्युटर्स ॲन्ड स्किल
ॲकेडमी, रामटेक

Principal
Shri Narendra Tidke College
of Art & Commerce, Ramtek
( सही व शिक्का )

पक्ष क्र. २
श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य
महाविद्यालय, रामटेक
तर्फे प्राचार्य श्रीमती डॉ. संगिता टक्कामोरे

साक्षदार :-

१) Prof A Khafare
२) Swapnil Meshram
३) Subhash Selokar